दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २० जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३१२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# कोण होणार सिंघम! राज्यात पोलीस भरतीचा बिगुल, विविध जिल्ह्यांतील एकूण १७ हजार ४७१ पदांची भरती

## पुण्यात 1219 पदांसाठी चुरस

पुणे शहर, ग्रामीण, लोहमार्ग पोलीस दल, तसेच कारागृह विभागातील १२१९ पदांसाठी आज पोलीस भरती प्रक्रिया सुरु झाली आहे. एक लाख ८१ हजार ७६९ उमेदवारांनी भरतीसाठी अर्ज दाखल केले आहेत.पुणे पोलीसांचे शिवाजीनगर पोलीस मुख्यालय, ग्रामीण पोलिसांचे चव्हाणनगर येथील मुख्यालय, खडकीतील दारुगोळा कारखान्याच्या मैदानावर मैदानी चाचणी पार पडणार आहे.पुणे पोलीस दलातील २०२ पदांसाठी २० हजार ३८२ अर्ज दाखल पुणे जिल्हा ग्रामीण दलामध्ये ४९६ पदांसाठी ४२ हजार ४०३ अर्ज कारागृहातील शिपाई पदाच्या ५१३ जागांसाठी एक लाख १० हजार ४८८ उमेदवारांचे अर्ज




राज्यात पोलीस भरतीची प्रक्रिया लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे अडकली होती. आजपासून भरतीचा बिगुल वाजला. राज्यातील विविध जिल्ह्यांत पोलीस भरतीसाठी सकाळपासूनच तरुणाईने गर्दी केली होती. विविध मैदानांवर तरुणांनी त्यांचा जोश दाखवला. परीक्षार्थी चाचणीसाठी मैदानावर पोहचले आहे. विविध जिल्ह्यांतील एकूण 17 हजार 471 पदांसाठी तरुण-तरुणी दमखम दाखवतील. काही ठिकाणी पावसाने व्यत्यय आणला असला तरी परीक्षार्थींची उमेद आणि उत्साह कायम दिसला. राज्यात रत्नागिरी, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, चंद्रपूरसह इतर ठिकाणी तरुणाई सिलेक्शनसाठी जीवाची बाजी लावत आहे. भरतीचा वाजला की बिगुलराज्यात 19 जूनपासून पोलीस भरती प्रक्रिया सुरु झाली. एकूण 17 हजार 471 जागांसाठी 17 लाख 76 हजार 256 अर्ज आले आहेत. बँड्समन पदाच्या 41 जागा, तुरुंग विभागात शिपाई पदाची जागा, चालक पदाच्या 1686 जागा, पोलीस शिपाई पदाच्या 9595 जागा तर शीघ्र कृती दलासाठी 4 हजार 349 जागांसाठी राज्यातील परीक्षार्थ्यांनी कंबर कसली आहे. सध्या सरकारी नोकरी मिळविण्यासाठी उच्चशिक्षित तरुणांनी पण पोलीस भरतीसाठी अर्ज केला आहे. ज्या उमेदवारांनी पोलीस भरतीसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यात अभियंता, वकील आणि उच्च शिक्षितांचा पण भरणा अधिक असल्याची माहिती समोर येत आहे. काही तरुणांनी दोन पदांकरीता अर्ज भरला आहे. एका व्यक्तीला दोन जागेवर एकाच पदासाठी मात्र अर्ज करता येणार नाही, असे जाहिरातीत स्पष्ट करण्यात आले आहे. रत्नागिरीमध्ये पावसाच्या व्यत्ययानंतर पोलीस भरतीसाठीची प्रक्रिया पुन्हा सुरु झाली.

## किनवट येथे शिवसेनेचा ५८ वा वर्धापन दिन साजरा



**नांदेड प्रतिनिधी बालाजी सिरसाट**
नांदेड : शहरातील जिजामाता चौकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा ५८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. किनवट शहरातील जिजामाता चौकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी मारोती दिवसे पाटील (तालुका प्रमुख) प्रशांत कोरडे,(शहर प्रमुख) शरद जैस्वाल (मा.नगरसेवक) अतुल दर्शनवाड (युवासेना प्रमुख) जयवंत चव्हाण,प्रमोद जाधव,केशव कराळे,भारत राठोड ,बजरंग वाडगुरे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## सौ.के.एस.के. महाविद्यालयास नॅकचा अ दर्जा

**प्रतिनिधी/बीड :-**
दि.१८ : येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास नॅक मुल्यांकन अ दर्जा प्राप्त झाला आहे, अशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी दिली आहे. दि.२७ व २८ मे २०२४ दरम्यान नॅक पुर्नमुल्यांकनाची चौथी सायकल नुकतीच पार पडली होती. महाविद्यालयास नॅकची समिती अध्यक्ष डॉ.रत्नेश गुप्ता, देवी अहिल्या विश्वविद्यालय, इंदोर (मध्यप्रदेश), समन्वयक डॉ.अनुपम महाजन, दिल्ली विद्यापीठ दिल्ली, सदस्य डॉ.मोहेंदर कुमार गुप्ता, पंडीत जवाहरलाल नेहरू शाासकीय पदव्युत्तर महाविद्यालय फरिदाबाद (हरियाणा) यांनी महाविद्यालयाचे मुल्यांकन केले. यामध्ये क्रीडा विभाग, संगीत विभाग, नाट्यशास्त्र, ग्रंथालय, मुलींचे वसतिगृह, विज्ञान विभाग, वाणिज्य विभाग, कला विभाग, एनएसएस, एनसीसी, कार्यालय, आयक्युएसी, प्राचार्य कार्यालय आदी विभागांना भेटी दिल्या. तसेच संस्था चालक, शिक्षक, पालक, आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. महाविद्यालयाच्या प्रगतीत विद्यार्थी पालक यांचा सहभाग आणि योगदान या विषयी चर्चा करून आपला अहवाल सादर केला. महाविद्यालयाची मागील पाच वर्षाची एकूण प्रगतीचे सात निकषांच्या आधारे मुल्यांकन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयास ३.१५ (सी.जी.पी.ए.) मिळाला असून अ दर्जा प्राप्त झाला आहे. हा दर्जा सातत्य




टिकवत सलग तिसऱ्यांदा प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे, सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर, प्राचार्य डॉ.एस. व्ही. क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.सतीश माऊलगे, आयक्युएसी समन्वयक डॉ.सोनाजी गायकवाड, कमवि उपप्राचार्य डॉ.एन.आर. काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर, डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधिक्षक डॉ.विश्वांभर देशमाने, आयक्युएससी सदस्य डॉ.एस.के.जोगदंड, डॉ.ए.एस. खान, डॉ.आर.एम.गुळवे, डॉ.एस. एस. जाधव, डॉ.डी.डी.रामटेके, डॉ.जी.डब्ल्यु. श्रीमंगले यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आदींनी अभिनंदन केले.


## मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड आयोजित प्रज्ञा प्रतिभावंतांचा ३० जून रोजी गौरव सोहळा

**नांदेडप्रतिनिधी:बालाजीसिरसाट**
नांदेड : मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेडच्या वतीने मराठा समाजातील दैदिप्यमान यश प्राप्त करणाऱ्या प्रज्ञा प्रतिभावंतांचा गौरव सोहळा ३०- जुन २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह किनवट येथे आयोजित करण्यात आला आहे. या गौरव सोहळ्यामध्ये मराठा समाजातील कला, क्रिडा, सांस्कृतिक, साहित्यीक, कृषी व शासनाने सन्मानित केलेल्या तसेच शिष्यवृत्तीधारक, प्रज्ञा शोध, नवोदय प्रवेशधारक, इयत्ता दहावीमध्ये ८० व बारावीमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त तसेच एमबीबीएसमध्ये प्रवेश घेतलेले, आयआयटी, प्रवेश धारक पदवीसाठी ८० टक्के, पदव्युत्तर पदवी ८० टक्के, सेट-नेट, पीएचडी धारक, एमपीएससी व युपीएससी परिक्षेत यावर्षी निवड झालेल्या या सर्व गुणवंतानी गुणपत्रकेची सत्यप्रत, प्रवेशाची सत्यप्रत २५-जूनपर्यंत 9623670212 ,9423836434 ह्या संपर्क क्रमांकावर सायंकाळी ५ वाजेपर्यंत जमा करुन नोंदणी करावी.असे आवाहन मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे.

## काँग्रेसच्या व्होट बँकेनेच उबाठा गटाला तारलं; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

शिवसेनेच्या 58 वा वर्धापन दिनानिमित्त शिवसेना एकनाथ शिंदे गटाचा मेळावा वरळीतील डोम सभागृहात झाला. यावेळी लोकसभा निवडणूकीत शिवसेना उद्धव गटाचा कोकणात आणि ठाणे जिल्ह्यात पराभव केला आहे. उद्धव ठाकरे यांना मिळालेल्या काही जागा केवळ त्यांना मिळालेल्या एकगठ्ठा मताने मिळाला असल्याचा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. उद्धव ठाकरे गटापेक्षा आमच्या स्ट्राईक रेट चांगला असून उद्धव ठाकरे गटाला काँग्रेसच्या व्होट बँकेने तारले असून ही व्होट बँक कायम सोबत राहील याची काहीही गॅरंटी नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले. शिवसेनेचा 58 वा वर्धापन दिन वरळीत साजरा झाला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर जोरदार टीका केली. उबाठा हा खोटारडा पक्ष आहे. खोटं बोला आणि रडा. खरेतर यांचं नाव रडेगट असं नाव त्यांना दिलं पाहिजे.

## शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या हस्ते उबाठा पक्षाच्या शाखा उद्घाटनाचा सोहळा संपन्न.



**केज/प्रतिनिधी**
शिवसेना ५८ वा वर्धापन दिनानिमित्त केज तालुक्यात मौजे वरपगाव येथे जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या हस्ते तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची शाखा उद्घाटन करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला यावेळी गावकऱ्यांच्या वतीने शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत या शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी जिल्हा सचिव रोहित कसबे शहर प्रमुख तात्या रोडे युवा सेना उपतालुकाप्रमुख लहु केदार शाखा प्रमुख प्रदीप देशमुख,उप शाखा प्रमुख आरुण देशमुख, शाखा सचीव आप्पा कांबळे, कार्याध्यक्ष गणेश देशमुख,सह सचिव बालासाहेब देशमुख, ज्येष्ठ मार्गदर्शक रमेश देशमुख, आण्णासाहेब देशमुख व सर्व शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.



## कविता

### मोहीम

शिवबांनी मावळ्यांसोबत
अनेक मोहीमा आखल्या।
त्या यशस्वी करण्यासाठी
जिद्दीने लढाया लढल्या॥१॥

आशिर्वाद माता भवानी
स्वराज्यजननी जिजाऊचा।
शूर छत्रपती शिवरायांना
मोठा आधार होता
त्यांचा॥२॥

अनेक क्रूरकर्म्यांना मारले
स्वराज्य घडी बसविली।
कित्येक मोहीमा मारून
शत्रूंना अद्दल
घडविली॥३॥

मोहीमांवर मोहीमा केल्या
औरंगजेबाला सतविले।
दिल्ली सोडायला लावले
अखेर महाराष्ट्रात गाढले॥४॥

मोहीमा यशस्वी केल्या
सुवर्ण इतिहास घडविला।
रयतेचे स्वराज्य स्थापून
उंच भगवा फडकविला॥५॥

सुरेश शिर्के
खारघर,पनवेल

# म्हणे, हल्ली पेपर वाचतो कोण? मग, बातम्या छापण्यासाठी आटापीटा का?

नुकतीच लोकसभेची निवडणूक पार पडली, बीड जिल्ह्यात राष्ट्रवादीचा उमेदवार अगदी काठावर विजयी झाला. राज्यात लढवलेल्या 10 जागापैकी 8 जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाने जिकल्या. निवडणुकीनंतर राज्यात राष्ट्रवादीच्या विजया पेक्षा जास्त चर्चा झाली ती राष्ट्रवादीला अडथळा ठरलेल्या "पिपाणी" ची त्यामुळे राष्ट्रवादीला साताराची जागा गमवावी लागल्याचा आरोपही झाला. ही चर्चा सुरु असताना मी एका राष्ट्रवादी नेत्याला म्हटले की, तुमच्या पक्षाला यावेळी नवे (तुतारी वाजवणारा माणूस) चिन्ह मिळाले होते. ते लोकांना कुठे दिसलंच नाही. एकाही वृत्तपत्रात किंवा त्यातल्या जाहीरातीत ते पहायला मिळाले नाही? तर ते महाशय म्हणाले, अहो, "हल्ली "पेपर" वाचतो कोण?"

लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह मिळाले होते. त्यांचे दहा पैकी 8 उमेदवार निवडूनही आले. पण त्यांची बहुसंख्य मते दुसऱ्या तुतारी म्हणवणाऱ्या पिपाणी चिन्हावर गेल्याचा त्या राष्ट्रवादी वाल्यांचा दावा आहे. बीड मध्ये ही त्या चिन्हावर सुमारे 54 हजार मते गेली आहेत. ती सर्व मते आपली आहेत, चुकून तिकडे गेली व आपल्यासाठी अवघड परिस्थिती निर्माण झाली असे राष्ट्रवादी वाल्याना वाटते. त्यात तथ्य किती? हा संशोधणाचा वेगळा विषय होऊ शकतो. पण यातून एक स्पष्ट होते की, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे "तुतारी वाजवणारा माणूस" हे चिन्ह सर्वापर्यंत पोहचलेले नव्हते.

मी गेली सुमारे 50 वर्षे पत्रकारिता आणि वृत्तपत्र (प्रिंट मिडिया) क्षेत्रात काम करत आहे. मी आता पर्यंत झालेल्या प्रत्येक निवडणुकीत वृत्तपत्रांचे महत्व आणि त्यांची भूमिका पहात आलेलो आहे. प्रत्येक पक्षाचा उमेदवार आपलं नाव आणि आपले निवडणूक चिन्ह नवे किंवा जुने असले तरी ते मतदारपर्यंत पोहचावे म्हणून वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांपर्यंत, मतदारापर्यंत पोहचावे यासाठी प्रयत्न करत असायचा. आपले विचार, आपला जाहीरनामा, आपली भूमिका पोहचवण्यासाठी बातम्या, लेख, पत्रकार परिषदा यांचा उपयोग होतो, पण चिन्ह मतदारापर्यंत पोहचण्यासाठी, कार्यक्रमाची, नेत्यांच्या प्रचारसभांची मतदारांना माहिती व्हावी यासाठी वृत्तपत्रातील जाहिरातीचाच उपयोग होतो हे सर्वश्रुत आहे.

यावेळी 2024 च्या लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदाच अशा सभा किंवा चिन्ह प्रचाराच्या जाहिराती वृत्तपत्रात पहायला मिळाल्या नाहीत. हा वृत्तपत्राना विशेषतः जिल्हास्तरीय वृत्तपत्राना जाहिरातीपासून दूर ठेवण्याची भूमिका सर्वच राजकीय पक्षानी घेतल्याचे अनुभवास आले. असे का घडले याचा शोध घेणे आवश्यकच होते आणि आहे. म्हणूनच मी वरील "तुमच्या पक्षाचे चिन्ह वृत्तपत्रात दिसलेच नाही?" अशी टिपणी त्या राष्ट्रवादी नेत्याकडे केली. त्यावरच त्यांनी ".....हल्ली पेपर वाचतो कोण?" असा प्रश्न विचारला आणि मी विचारात पडलो.

हल्ली सोशल मीडिया, समाज माध्यम, युट्यूब, फेसबुक आणि त्यावरील रिलचा जमाना आहे. त्यावर माहिती टाकली, जाहिरात केली तरी काम होते. असा लोकांचा, राजकीय पक्षांचा आणि राजकीय नेत्यांचाही समज झाला आहे आणि त्यामुळेच या निवडणुकीत चन्हाची माहिती मतदारापर्यंत पोहचावी यासाठी वृत्तपत्रांची गरज आहे असे त्यांना वाटले नाही. त्यामुळेच उमेदवारांनी वृत्तपत्रातुन चिन्हांची प्रसिद्धी केली नाही. त्याचवेळी त्यांनी स्वतःचा "हल्ली वृत्तपत्रे वाचतो कोण?" असाही समज करून घेतला असावा. कदाचित ते खरेही असेल.



-नरेंद्र कांकरिया,
संपादक, दै. बीड संकेत
9422241310

कोरोना पासून वृत्तपत्रे विकत घेऊन वाचण्याचे 10 ते 15 टक्के प्रमाण कमी झाले आहे हे खरे असले तरी वृत्तपत्रे वाचण्याचे बंद झाले आहे असे समजणें चुक आहे. कोणतेही वृत्तपत्र विकत घेऊन कमी वाचले जात असले तरी, तेच वृत्तपत्र मोबाईल, कॉम्पुटर वर त्याची व्हेंब आवृत्ती, पीडीएफ अवृत्तीतील वृत्तपत्रे मोठ्याच नव्हे तर पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात वाचली जातात ही वस्तुस्थिती आहे. गेल्या काही वर्षा पासून मी आमच्याच (बीड संकेत) दैनिकांची व्हेंब आणि पीडीएफ प्रत व्हाट्सअँप, युट्यूब, फेसबुक, टेलिग्राम या माध्यमातून दररोज सकाळी 6 ते 6.30 च्या दरम्यान पाठवतो आणि या माध्यमातून "संकेत" मोठ्या प्रमाणावर वाचला जातो हा माझा अनुभव आहे, तसाच तो इतर वृत्तपत्रांचाही आहे. मला अंक फॉरवर्ड करण्यास सकाळी थोडाफार उशीर झाला तर फोन अथवा मेसेजच्या माध्यमातून लक्षनिय प्रमाणात विचारणा केली जाते. मग वृत्तपत्रे हल्ली वाचली जात नाहीत असे कसे म्हणता येईल.

जर कोणाचा दावा असेल की, "हल्ली वृत्तपत्रे वाचतो कोण?" तर असे म्हणणारे राजकीय पक्ष, राजकारणी नेते किंवा आणखी कोणी यांना आपल्या बातम्या, फोटो वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पाहिजेत, छापल्या पाहिजेत असे का वाटते? आणि त्या छापून याव्यात यासाठी आटापीटा का केला जातो? आपली प्रसिद्धी, आपले चिन्ह वगैरे समाज माध्यमावर देऊन काम होते, त्यासाठी वृत्तपत्रांची गरज नाही, असे वाटते तर त्यांना बातम्या, फोटो साठी वृत्तपत्रेच का हवी असतात? याचा विचार राजकीय नेते, राजकीय पक्ष किंवा इतर कोणी जाहिरातदार करणार नसतील तरी या क्षेत्रात काम करणारानी आणि वृत्तपत्र चालकांनी आपला व्यवसाय म्हणून नक्कीच केला पाहिजे.

# महाविकास आघाडीचे बजरंग बप्पांच्या विजयात अनेक किंगमेकर

## सामान्यात मात्र चर्चा जिल्हाभर भिंगरी बाधुन फिरणाऱ्या शेकापच्या भाई मोहन गुंड यांची

**केज : प्रतिनिधी**

बीड लोकसभेचा निकाल लागला असून बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयामध्ये जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते,नेते यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. खरंतर ही निवडणूकच लोकांनीच हातात घेतली गेली होती, निवडणूकीत प्रत्यक माणसात वावरणारा माणुस महत्वाचा असतो. मात्र यात काही आसे चेहरे होते, त्यांनी पडद्या मागे खूप काम केले. आमदार संदिप क्षिरसागर सोडले तर , महाविकास आघाडीत एक ही दिग्गज नेता बजरंग सोनवणे यांच्या सोबत नसताना देखील विजय मिळवता आला म्हणजे मराठा, मुस्लिम, बौद्ध समाजाची एकी भाजपवर नाराज असलेल्या सर्वच घटकातील लोकांनी विजय मिळवून दिला हे सत्य कोणाला नाकारता येणार नाही. बीड जिल्ह्यामध्ये बजरंग सोनवणे यांच्या निवडणुकीत आसच एक चेहरा होता, एकाच पक्षात निष्ठेने 20 वर्ष काम करणार व्यक्तिमत्व म्हणजे शेकापचे भाई मोहन गुंड, भाईंचे अनेक चळवळीतील लोकांशी असलेले मैत्री पुर्ण संबंध, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अनेक यशस्वी आंदोलनाच रेकॉर्ड त्यांच्या नावावर आहे. कापुस, ऊस, पिक विमा, पिक कर्ज, कर्जमाफी या सारखे आशा अनेक कितीतरी प्रश्नावर जिल्हाभरात खूप काम केलं आहे. शेतकरी कृषी कायद्याच्या विरोधात तर जिल्ह्यातील बैलगाडी मोर्चेने जिल्ह्यात रान पेटवले. २०१० मध्ये राष्ट्रपतीच्या गाडीखाली ऊस बिलासाठी उडी घेईन म्हणून उमरीच्या विखे पाटील करखान्याला ४ कोटी रुपये शेतकऱ्यांना द्यायला भाग पाडले. शंभू महादेव साखर कारखान्याचा लिलाव करून शेतकऱ्यांना जवळपास 10 कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळवुन दिले. शेतकऱ्यांचा कुठला ही विषय असो भाई गुंड रस्त्यावर काहीच राजकीय आधार नसलेला कार्यकर्ता मात्र लढताना अनेक वर्ष लोक बघत आहेत. मोकळा स्वभाव, आंबेडकरी ,डाव्या चळवळीतील लोकांशी आसलेले घनिष्ट संबंध प्रचंड जनसंपर्क असलेला कार्यकर्ता. शेतकरी कामगार पक्ष कधी सत्तेत येईल का नाही यांची खात्री नसताना सुद्धा पक्षाचं काम एकनिष्ठपणे करणाऱ्या चेहऱ्याचा बजरंग बप्पाना मात्र फायदा झाला. शेतकरी कामगारांसाठी संघर्ष करणारा भाई मोहन गुंड हे मित्र पक्ष म्हणून भिंगरी लाउन जिल्ह्यात फिरताना दिसले. प्रचारात सौ सारीकाताई सोणवणे यांच्या सोबत भाईंची पत्नी सौ शिवकन्या गुंड या पुर्ण निवडनुकीत परिवार म्हणून सोबत होत्या.

अटीतटीच्या लढाईत बजरंग सोनवणेसाठी



सर्वांना एकाच वेळी भेटन बोलन सोप नव्हत. लढाईत डावे पक्ष,मराठा आंदोलक, आंबेडकरी चळवळीतील प्रमुख, मुस्लिम समाजातील सामाजिक क्षेत्रात काम करणारे प्रमुख लोकांनवर छाप असनारे माणसं जोडण्याच उत्तम नियोजन बद्ध काम केलेला चेहरा म्हणून आज भाई मोहन गुंड यांची चर्चा सर्वसामान्य लोक करत आहेत. या निवडणुकीत कोनीच कोणाचं ऐकत नव्हतं कोणी कोणाला सांगावं अशी परिस्थिती नव्हती. बीड जिल्हा हा फुले शाहू आंबेडकर यांचा वारसा जपणारा जिल्हा आहे. पुर्वी क्रांतीसिंह नाना पाटील, कॉम्रेड गंगाधर आप्पा बुरांडे, बबनराव ढाकणे हे डाव्या पक्षाचे खासदार राहीले. आज घडुळ राजकारण आसंल तरी डावे पक्ष इथे तग धरुन आहेत.अनेक ग्रामपंचायतीत सत्ता आहे. अनेक वेळा पुरोगामी म्हणवून फक्त निवडणुकी पुर्ता वापर होतो म्हणून अनेकांची नाराजी होती, मात्र विचार ठाम असनारे डावे यावेळी प्रचारात आघाडीवर होते यात कॉ अजय बुरांडे, कॉम्रेड नामदेव चव्हाण कॉ भाऊराव प्रभाळे, दत्ता डाके, अॅड भाई नारायण गोले, कॉ मोहन जाधव, आसे अनेक रस्त्यावरचे चेहरे होते. बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी भाई मोहन गुंड हे स्वतः अहोरात्र जिल्ह्यातील गावा गावात जाऊन संवाद साधत मोट बांधली, बजरंग बप्पा यांच्या मागे ताकद उभी करून त्यांना निवडून आण्यासाठी जिल्हाभरातील शेकापसह मित्र पक्षाची ताकद बजरंग बप्पाच्या पाठीशी उभी करण्यात भाई मोहन गुंड यशस्वी ठरले आसल्याची चर्चा आहे. विजयाचे किंग मेकर खूप असले तरी ग्राऊंडवर मात्र भाई मोहन गुंड हा कार्यकर्ता जिल्हाभर बप्पाच्या कामी आला असल्याची भाई नावाची चर्चा जिल्हाभरात आहे..

> हि निवडणूकच खुप अटीतटीची ग्रामपंचायत प्रमाणे झाली. भाजपवर समाजात रोष होता. शेतकरी विरोधी कायदे, मराठा आंदोलन ,संविधान बदलण्याची भाषा, मुस्लिम विरोधी भुमीका, या मुळे महाविकास आघाडीला मतदान करण्यासाठी लोक आतुरलेले होते. जिल्ह्यात खुप स्वाभिमानी लोक आहेत, बप्पाच्या जवळ मोठे नेते नव्हते म्हणून माझ्या सारख्यावर लोकांत पोहचणे ही जबाबदारी होती. शब्द दिलेल्या लोकांची आशा आम्ही भंग होऊ देणार नाहीत, जनतेच्या कामी येऊत.
> भाई मोहन गुंड शेकाप नेते

## ओबीसीच्या हक्कासाठी बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधवांनी प्रा. लक्ष्मण हाके सरांच्या व नवनाथराव वाघमारे सरांच्या पाठीशी उभा राहावे. मल्हारश्री- शिवराम शिरगिरे.

राज्य सरकार ओबीसी समाजाच्या विरोधात भूमिका घेत असल्यामुळे गाववाडी वस्तीवर तंडयावर राहणारा वंचित समाज ओबीसी मध्ये असलेला ह्या समाजाचा राजकीय व शैक्षणिक आरक्षण मराठा समाजाला देतं का काय अशी भूमिका राज्य सरकारच्या असल्यामुळे ओबीसी समाजामध्ये राज्य सरकार विषयी तीव्र विरोध आहे, राज्य सरकारने ओबीसी समाजाला लेखी पत्र देऊन विश्वास देवा की आम्ही ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कसलाही धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देणार आहोत. राज्य सरकार स्वत:ची राजकीय पोळी भाजण्यासाठी दोन समाजामध्ये गेली एक वर्षापासून आरक्षणाच्या नावावर जो महाराष्ट्रामध्ये व जास्ती करून मराठवाड्यामध्ये जो वाद चालू आहे त्या वादाला एका समाजाला पाठबळ देऊन दुसऱ्या समाजाला विरोधामध्ये जाण्यासाठी हे सरकार भाग पाडत आहे. जर या सरकारची अशीच भूमिका विधानसभेपर्यंत



राहिली तर ओबीसी समाज वंचित समाज राज्य सरकारला घरी बसल्याशिवाय राहणार नाही. राज्य सरकारने दोन जाती-जातीमध्ये वाद निर्माण करण्याचे काम केले आहे ते सरकारने थांबावं अन्यथा ओबीसी समाज राज्य सरकारला माफ करणार नाही. असे बीड जिल्हा ओबीसी समाजाच्या वतीने राज्य सरकारला आव्हान करण्यात आले. ओबीसी समाजाने त्यांचा हक्क अधिकार कायम ठेवण्याकरिता प्राध्यापक लक्ष्मण हाके सर व नवनाथराव वाघमारे सर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहावे.

## पराभव जिव्हारी लागलाय... वचपा काढणारच; उद्धव ठाकरे कडाडले

शिवसेनेच्या 58 व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ठाकरे गटाकडून आज मुंबईत षण्मुखानंद सभागृह येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि शिंदे गटावर सडकून टीका केली. देशात नुकतंच लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत ठाकरे गटाचे महाराष्ट्रात 9 खासदार जिंकून आले. तर काही ठिकाणी ठाकरे गटाच्या उमेदवारांचा थोडक्यात पराभव झाला. ठाकरे गटाच्या उमेदवारांचा झालेला पराभव हा उद्धव ठाकरे यांना प्रचंड जिव्हारी लागला आहे. या पराभवाचा आपण वचपा काढणारच, अशी भीष्म प्रतिज्ञा उद्धव ठाकरे यांनी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीत आपण पराभवाचा बदला घ्यायचा, असं उद्धव ठाकरे म्हणाले "काही योद्धे आपले पराभूत झाले. जगाने दाखवून दिलं भाजप अजिंक्य नाही. मोदी अजिंक्य नाही. मोदींचे पाय मातीचेच आहे हे इतिहासात लिहिलं जाईल. खंडोजी खोपडे सूर्याजी पिसाळ ही नावे घेतल्यावर आपण काय म्हणतो. किती वर्ष झाली. यांच्या कपाळावरचा गद्दारीचा शिक्का पुसला नाही. यांचाही पुसणार नाही. इतिहासात गद्दार की योद्धा म्हणून नोंदवलं पाहिजे,. मी हिंमत हारणार नाही. काही हारजीत होत असते. निवडणूक हरलो तर उद्या जिंकेल. पण हिंमत हरलो तर जिंकू शकणार नाही. हिंमत हरणार नाही. तुम्हाला हरू देणार नाही.

# काटे पिंपळगाव येथील तलाठी व माजी पंचायत समिती सदस्य दहा हजार रुपयाचीलाच घेताना जाळ्यात

गंगापूर/प्रा संजय तुपे वारसा हक्काने सातबारावर नोंदीसाठी दहा हजार रुपयांची लाच घेताना पंचायत समिती सदस्य व तलाठ्याला लाचलुचपत विभागाच्या पथकाने तहसील कार्यालयात रंगेहात पकडले २८ वर्षीय तक्रारदार यांचे वडील व चुलत भाऊ यांची सातबारावर वारसा हक्काने नोंद घेऊन सातबारा देण्यासाठी आरोपी लोकसेवक तलाठी प्रवीण दिलवाले यांनी पंच समक्ष दहा हजार रुपये लाचेची मागणी करून दहा हजार रुपये लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य करून लागलीच १९ जून रोजी त्यांचा समक्ष दहा हजार रुपये लाचेची रक्कम त्यांच्या सोबत असलेले खाजगी ईसम माजी पंचायत समिती सदस्य बद्रीनाथ चव्हाण यांच्याकडे देण्यास सांगितले असता खाजगी इसम यांनी लाज रक्कम स्वतः स्वीकारली असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा पथकाने तलाठी प्रवीण अशोक दिलवाले वय ४७ वर्ष व्यवसाय नोकरी तलाठी सजा काटेपिंपळगाव तालुका गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर वर्ग 3 राहणार वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर व खाजगी संभाजी पंचायत समिती सदस्य बद्रीनाथ लक्ष्मण चव्हाण वय वर्ष ३८ वर्ष व्यवसाय शेती राहणार काटे पिंपळगाव तालुका गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर यांना लाच रकमेसह ताब्यात घेण्यात आले असून गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे ही कारवाई लाचलूचपत विभागाचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव पोलीस उपअधीक्षक राजू तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष धस, पोलीस अमलदार युवराज हिवाळे, केवलसिंग शिंदे, चालक पोलीस अमलदार बागूल, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर



## २०२० व २०२३ पीकविम्यासाठी गुंदेकर यांनी सुरु केलेल्या आंदोलनात पालवण येथील शेतकऱ्यांचा पाठिंबा - अशोक पवार, गोविंद मस्के

**बीड (प्रतिनिधी)**

बीड जिल्ह्यातील १ लाख ५ हजार शेतकऱ्यांचा २०२३-२४ मधील पीकविमा हा कंपनीकडून खरीप हंगाम सुरू झालेला असताना देखील देण्यात आलेला नाही. या शेतकऱ्यांना पिकविम्याची ६२ कोटी रुपये रक्कम देण्यात यावी यासाठी शेतकरी नेते धनंजय गुंदेकर यांनी चळवळ उभी केली असून पालवण, येथील शेतकऱ्यांचा पाठिंबा असल्याचे प्रसिध्दी पत्रकाद्वारे अशोक पवार, गोविंद मस्के यांनी म्हंटले आहे.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २०२० मधील पीकविमा मिळालेला नाही, यावर्षी दुष्काळ असूनही अनुदान जिह्यातील ८ तालुक्यांना मिळाले नाही. जिल्ह्यातील कृषी मंत्री असूनही शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे.१ लाख ५ हजार शेतकऱ्यांचा २०२३-२४ मधील पीकविमा हा कंपनीकडून खरीप हंगाम सुरू झालेला असताना देखील देण्यात आलेला नाही. या शेतकऱ्यांना पिकविम्याची ६२ कोटी रुपये अद्याप मिळाले नसून लवकरच धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे आंदोलन बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार असल्याचा इशारा पालवण येथील शेतकरी अशोक पवार, गोविंद मस्के यांनी दिला आहे.

## मधुबन कट्ट्यावर कवितेच्या माध्यमातून बरसल्या पाऊस धारा.

उरण/विठ्ठल ममताबादे पावसाची आतुरता हा विषय घेऊन मधुबन कट्ट्यावर संपन्न झालेल्या १०४ व्या कविसंमेलनात जेष्ठ नागरिकांना काव्यरूपी पाऊसधारा अनुभवायला मिळाल्या.कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण तर्फे विमला तलाव उरण शहर येथील मधुबन कट्ट्यावर माजी नगरसेवक माणिकराव पाटील यांचे अध्यक्षते खाली कवी संमेलन संपन्न झाले. या कविसंमेलनात कु.अनुज शिवकर,दौलत पाटील,हेमंत पाटील,संजय होळकर,मारुती तांबे,रामचंद्र म्हात्रे,अजय शिवकर,मच्छिंद्र म्हात्रे, प्रा.साहेबराव ओहळ ,नरेश



पाटील प्रा.एल.बी.पाटील आदी कवींनी आतुरता पावसाची या विषयावर आपल्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या उत्तर भागात सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक कार्यात योगदान देणा-या उरणातील प्रतिष्ठित नागरिकांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. ऑक्सिजन पार्क तयार करून पर्यावरण विषयी जनजागृती करणारे पर्यावरण मित्र सारडेचे नागेंद्र परशुराम म्हात्रे ,किर्तन व अध्यात्मिक सेवेतून प्रबोधन करणारे सोनारीचे नारायण तांडेल आणि मेल फिमेल व्हाईस सिंगर म्हणून रसिक वर्गाचे मनोरंजन करणारे चिरनेरचे मोहन फुंडेकर यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.सदर कार्यक्रमास रायगड भूषण प्रा. एल बी पाटील,मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष श्रीरामचंद्र म्हात्रे,पत्रकार घनशाम कडू, पत्रकार विठ्ठल ममताबादे, राधाताई बीस्ट, अनिता शिवकर,नरेश पाटील,दत्ताराम नीलवर्ण,सुरेश भोईर,तानाजी गायकवाड,अनंत पाटील,भिकाजी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले तर आभारप्रदर्शनाचे काम जेष्ठ कवी हेमंत पाटील यांनी केले.

# गेवराई शहरातील मोकाट कुत्र्यांच्या लसीकरण दरम्यान एका पाळीव कुत्र्याचा मृत्यू लसीकरणाने मृत्यू नसून, त्याला जबर मारहाण करून जीवे मारले आहे; तक्रारदाराचा आरोप

## पंधरा दिवस उलटूनही अद्याप गुन्हा दाखल नाही; गेवराई पोलिसांकडून कारवाई करण्यास टाळाटाळ

**गेवराई | प्रतिनिधी**

गेवराई : शहरातील मोकाट कुत्र्यांच्या लसीकरणाची मोहीमाचे आदेशित राधा कृष्ण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गेवराई यांना करण्यात आले होते. त्या अनुषंगाने शहरातील मोकाट कुत्र्यांचे लसीकरण मोहीम दरम्यान एका पाळीव कुत्र्याचा मृत्यू झाला आहे. लसीकरण दरम्यान मृत्यू नसून त्याला जबर मारहाण करून नियोजित कट रचून जीवे मारले असल्याचे संतापलेल्या तक्रारदारांनी आरोप केला आहे. याप्रकरणी चौकशी करून अद्याप कोणतीही कारवाई केली नाही. कारवाई करण्यासाठी पोलिसांकडून टाळाटाळ होत आहे. सदरील या प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने सर्वत्र स्तरावरून हळहळ व्यक्त केली जात आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार सौ. मीना रमाकांत येवले (रा.रंगार चौक, गेवराई) यांचा पाळीव कुत्रा या संबंधित संस्थेने दि.३० मे २०२४ रोजी लसीकरणासाठी ताब्यात घेतला होता. परंतु त्याचा लसीकरण दरम्यान मृत्यू झाला आहे. तर



लसीकरण दरम्यान मृत्यू नसून त्याला तोंडावर , अंगावर असे मारहाण करून

त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले जात आहे. मग हा मृत्यू नेमका कशाने झाला यांची चौकशी झालेली नसून, गुन्हा दाखल करण्यास संबंधित गेवराई पोलीस टाळाटाळ करीत आहेत. याप्रकरणी नगर परिषद गेवराई यांनी याप्रकरणाची सखोल चौकशी करून पाळीव कुत्र्याच्या मृत्यूचे कारण व खुलासा तात्काळ मिळावा आणि दोषींवर दंडात्मक कारवाई करण्याचे पत्र गेवराई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांना दिले आहेत. परंतु यावर गेवराई पोलिसांकडून कुठली कारवाई करण्यात आली नाही. तक्रारदार मीना येवले यांनी वारंवार पोलीस ठाण्यात चकरा मारल्या परंतु त्यांना संबंधित पोलिसांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. या कुत्र्याचं शॉम्पंल छत्रपती संभाजीनगरला पाठवायचे आहे. तो रिपोर्ट येईल, मग त्यानंतर कारवाई केली जाईल, त्यानंतर काही दिवसांनी पोलिसांना याबाबत माहिती विचारली असता, आम्ही शॉम्पंल पाठवलं होतं. परंतु याप्रकरणी गुन्हा दाखल नसल्याने परत पाठवण्यात आले आहे. मग ताबडतोब गुन्हा दाखल का केला नाही. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी जाणीवपूर्वक याकडे पोलीस दुर्लक्ष करून टाळाटाळ करीत असल्याचे तक्रारदार येवले यांनी बोलताना सांगितले आहे. तसेच याप्रकरणाची सखोल चौकशी करून पाळीव कुत्र्याचा मारहाण करून जीव घेणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी संतापलेल्या तक्रारदार येवले यांनी केली आहे.

# डॉक्टरचे दोन लाख रुपये हिसकावून चोरटे पसार

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई - बँकेतून दोन लाखांची रक्कम काढून दुचाकीवरून घराकडे निघालेल्या डॉक्टरची हँडलला अडकवलेली पैशाची बॅग हिसकावून चोरट्यांनी पोबारा केल्याची घटना मंगळवारी सकाळी अंबाजोगाई शहरात घडली. अधिक माहिती अशी की, शरद बाळासाहेब जगताप (रा. जैन गल्ली, अंबाजोगाई) हे पशू चिकित्सक आहेत. गावकडे शेड बांधणे आणि लेब्रचे पेमेंट करण्यासाठी त्यांनी मंगळवारी



सकाळी अंबाजोगाई पीपल्स बँकेतून २ लाख ५ हजार रुपये काढले. ही रक्कम त्यांनी एका कापडी पिशवीत ठेवली आणिदुचाकीचा हँडलला अडकवून ते शेतगड्यासह घराकडे निघाले. ते सन्मती पतसंस्थेच्या समोर आले असता दुचाकीवरून पाठलाग करणाऱ्या दोन चोरट्यांनी गाडी वळवून समोरून येत त्यांच्या दुचाकीला धक्का दिला आणि हँडलला अडकवलेली पैशाची बॅग घेऊन ते कुत्तर विहीर रोडने पसार झाले. याप्रकरणी शरद जगताप यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला

## अनिल परब बेडूक आणि पेंग्विन पोर, अजितदादा थोडे दिवस... भर सभेत रामदास कदम काय बोलून गेले?

शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी वर्धापनदिनाच्या सोहळ्यात बोलताना ठाकरे गटावर जोरदार टीका केली. शिवसेना वाढविण्यात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचे योगदान काय असा थेट सवाल त्यांनी केला. शिवसेनाप्रमुख असायचे तेव्हा नेत्यांची मिटिंग व्हायची. नेत्यांना विश्वासात घेऊन पुढे जायचे. पण, हा माणूस एकटाच सगळं बघतो. शिवसैनिक आमचे गुलाम आहेत. शिवसेना यांची प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे असे यांना वाटते, अशी जळमळीत टीका त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. तर, अजितदादा थोडे दिवस आमच्यासोबत नसते आले तरी चालले असते असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची कोंडी केली.

# हे सर्व सरकार घडवतंय:मराठा-ओबीसी आरक्षणाच्या वादावर मनोज जरांगे पाटीलांचा गंभीर आरोप



गेल्या सहा दिवसांपासून ओबीसी सामाजेच नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचे उपोषण सुरु आहे. त्यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस आहे. जालना जिल्ह्यातील वडीगोद्री गावात ओबीसी सामाजेच नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचं उपोषण सुरू आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागू नये या मागणीसाठी ओबीसी सामाजेच नेते आग्रही आहेत. अशातच मनोज जरांगे पाटील हे असंवैधानिक भाषा वापराय, त्यांचं राज्यात काय षडयंत्र सुरू आहे? असा सवाल ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केलाय. यावर मनोज जरांगे पाटील यांनी पलटवार केला आहे. ओबीसी समाजाचं सुरू असेललं आंदोलन सरकार पुरस्कृत आहे. हे सर्व सरकार घडवून आणतंय असं म्हणत मराठा-ओबीसी आरक्षणाच्या वादावर मनोज जरांगे पाटील यांनी हा घणाघाती आरोप केला आहे.

# बॉलीवूड अभिनेत्री.. चित्रा दीक्षित यांची खाकी लय भारी चित्रपटामध्ये मुख्य भूमिका.



कवि सरकार इंगळी शेवगाव पांडुरंग गोरे - दिग्दर्शक यांचा देशभक्ती वरती आगामी मराठी चित्रपट खाकी ...लय भारी या मराठी चित्रपटांमध्ये बॉलीवूड अभिनेत्री चित्रा दीक्षित यांची खाकी... लय भारी चित्रपटांमध्ये सर्वानुमते निवड करण्यात आली आहे, या निवडीचे पत्र त्यांना दिग्दर्शक पांडुरंग गोरे श्री उद्धव फंगाळ सर यांनी दिले आहे, रवीशा तेलधुणे यांच्यासोबत बॉलीवूड अभिनेत्री चित्रा दीक्षित परफॉर्मन्स करणार आहेत, पोलीस कथेवर बेतलेला हा सामाजिक मराठी कौटुंबिक , कॉमेडी चित्रपट असून यामध्ये बॉलीवूड अभिनेत्री चित्रा दीक्षित व रविशा तेलधुणे यांच्यावरती आला... टांगमोडे हवालदार... तुझ्या जिवाचा मैतर झाला... दोन जीवाची जोडी जिवलग झाली.. हे साँग चित्रित होणार आहे व हे साँग जबरदस्त झाले आहे, या चित्रपटाची कथा स्टोरी व गाणी दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांनी लिहिली आहे, चित्रा दीक्षित यांचे बॉलीवूड व मराठी फिल्म इंडस्ट्री मध्ये आपल्या नावाची दखल घेण्यास भाग पाडले आहे व आपल्या अभिनयाच्या जोरावरती मराठीसह हिंदी फिल्म इंडस्ट्रीमध्ये शिक्का मोर्तब केला आहे, आज सर्वांच्या पसंतीची नंबर वन सिने अभिनेत्री म्हणून चित्राकडे पाहिले जाते ... तू बघ मागे वळून चित्रा हे साँग युट्यूबवरती, टीव्ही चॅनल वरती जबरदस्त गाजले आहे, या एका गाण्यांनी चित्रा दीक्षितला सुपरस्टार बनवले आहे, खाकी... लय भारी या चित्रपटांमध्ये त्यांची जबरदस्त , गावरान ,कॉमेडी सह सुंदर घायाळ करणारी अदाकारी पाहण्यास प्रेक्षकांना मिळणार आहे, खाकी... लय भारी हा मराठी चित्रपट दिवाळीपर्यंत चित्रपट थेटर मध्ये झळकणार आहे

# प्रा. नवनाथ खेत्री यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**माजलगाव प्रतिनिधी .**

दिनांक १५/०६/२०२४ भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई, संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथील समाजशास्त्र विषयाचे सहाय्यक प्रा. नवनाथ खेत्री यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून समाजशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. याबद्दल स्टाफ अकादमीच्या वतीने प्रमुख डॉ. गंगाधर उषमवार यांनी महाविद्यालयात त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे, महाविद्यालय अर्थ समितीचे अध्यक्ष श्री. एकनाथराव जाधव यांनी त्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात केला.





प्रा. नवनाथ खेत्री यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल भा.शि. प्र. संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य श्री. अमरनाथ खुर्पे, श्री. प्रकाश दुगड, श्री.विष्णुपंत कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्री. अभय कोकड, स्थानिक अध्यक्ष श्री. सुरेंद्र रैदासनी, कार्यवाह एडवोकेट श्री. विश्वास जोशी,माध्यमिक विभागाचे अध्यक्ष श्री.प्रशांत भानप, शिशुविहार विभागाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत जोशी, प्राथमिक विभागाचे अध्यक्ष श्री.पवन मानधने, श्री.मधुर रूद्रवार, नॅक समन्वयक डॉ. विनायक देशमुख, कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, डॉ.युवराज मुळये, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अंकुश साबळे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. संतोष लिंबकर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. शिवाजीराव हेंडगे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

त्यांनी "पाणी फाउंडेशनच्या वॉटर कप स्पर्धेमध्ये सहभागी गावांचा समाजशास्त्रीय अभ्यास : मराठवाड्याच्या विशेष संदर्भात" या विषयावर संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ. सुधीर आ. येवले, (कालिकादेवी महाविद्यालय शिरूर (का), यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. बहिस्थ परीक्षक प्रा. डॉ. सुरेश धनवडे ( समाजशास्त्र विमागप्रमुख, शंकरनगर ता. बिलोली जि नांदेड,), डॉ. लक्ष्मणसिंग साळोक, डॉ. तात्याराम सोंडगे. डॉ. साहेबराव हिवाळे, डॉ. गणेश मोकासरे, आई-वडिल, मित्र, नातेवाईक तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## तर भुजबळ नक्की मुख्यमंत्री झाले असते', संजय राऊत नेमकं काय म्हणाले?



लोकसभा निवडणूक आणि आता राज्यसभा निवडणूक लढवण्याची इच्छा असूनही संधी न मिळाल्यामुळे छगन भुजबळ नाराज असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता छगन भुजबळांची ठाकरे गटाशी चर्चा सुरू असल्याच्या चर्चा सुरू असल्याचे म्हटले जात आहे. यासंदर्भात बोलताना संजय राऊत यांनी हा दावा साफ फेटाळून लावला आहे. ते म्हणाले, छगन भुजबळ हे एकेकाळी शिवसेनेत होते, नंतर ते राष्ट्रवादीत गेले आता ते अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत आहेत. ते मोठे नेते होते. पण ते शिवसेना या पक्षात नाहीत, असे स्पष्टपणे संजय राऊत यांनी म्हटले. पुढे ते असेही म्हणाले की, पण आता छगन भुजबळ आता शिवसेनेत काही गुप्त चर्चा सुरू आहेत,

# महाउद्योजक रत्नदीप पुरस्काराने विनोद पोखरकर सन्मानित

**पुणे येथे सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सायली संजीव यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण पोखरकर यांच्या निवडीचे मराठवाड्यातून स्वागत**

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

येथील प्रसिद्ध व्यावसायिक तथा हॉटेल साई सुरभीचे संस्थापक विनोद सिद्राम आप्पा पोखरकर यांना टायकोन्स ऑफ एशिया यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा महाउद्योजक रत्नदीप पुरस्कार - २०२४ नुकताच पुणे येथे आयोजित एका विशेष समारंभात सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सायली संजीव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पोखरकर यांच्या निवडीचे मराठवाड्यातून स्वागत होत आहे प्रसिद्ध व्यावसायिक तथा हॉटेल साई सुरभीचे संस्थापक विनोद सिद्राम आप्पा पोखरकर यांना टायकोन्स ऑफ एशिया यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा महाउद्योजक रत्नदीप पुरस्कार - २०२४ हा रविवार, दिनांक १६ जुन रोजी पुणे येथे आयोजित एका विशेष समारंभात सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सायली संजीव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. खरे तर जीवनाच्या प्रवासात यशाला कधीच शॉर्टकट नसतो हे वास्तव कोणी ही नाकारू शकत नाही. जीवनामध्ये स्वतःला यशाच्या उच्च शिखरावर घेऊन जाण्यासाठी कष्टाशिवाय पर्याय नाही. ज्यांनी यशाचे हे गमक जाणले तो मात्र जीवन प्रवासात कितीही संकटे आली तरी यशाला गवसणी घालणारच हे मात्र नक्की. असेच एक आपल्या सर्वांसमोर असलेले यशस्वी व्यक्तिमत्व म्हणजे विनोद पोखरकर होय हे होय. आज आपण समाजामध्ये पाहत आहोत की, अनेक युवक उच्च शिक्षित असून ही नौकरी मिळत नाही म्हणून बेरोजगार आहेत. परंतु, उच्च शिक्षण घेऊन ही पोखरकर यांनी नौकरीच्या मागे न लागता. व्यवसायाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण मेहनत घेत, कठोर परिश्रम करून समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रामाणिकपणे व्यवसाय केला तर आपल्या समाजात उच्च स्थान मिळवून आदर्शवत जीवन जगता येतं हे विनोद पोखरकर यांनी दाखवून दिले आहे. आज अंबाजोगाई शहरात हॉटेल साई सुरभी या उद्योग समूहाच्या माध्यमातून त्यांनी अनेक युवकांना





रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्या सोबतच ते स्वतःही आपल्या व्यवसायामध्ये पूर्ण योगदान देऊन व्यवसायाच्या माध्यमातून अंबाजोगाई शहरातील व पंचक्रोशीतील समाजातील जे वंचित, उपेक्षित घटक आहेत. त्यांच्या स्वतःच्या व्यवसायातून मिळालेल्या आर्थिक उत्पन्नातून ते सामाजिक योगदान देतात. पोखरकर हे कुशल संघटक आहेत. स्वतःचा व्यवसाय सांभाळून ते सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. विशेषतः कोविड काळात केलेले जनसेवेचे प्रभावी सामाजिक कार्य, समाजातील गरजू, गोरगरीब, होतकरू तरूण वर्गाला ते करीत असलेले भरीव सहकार्य आणि त्यांचा बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात असलेला त्यांचा मोठा जनसंपर्क आहे. यापूर्वी अंबाजोगाईत विनोद पोखरकर यांचे पुढाकारातून महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव सुरू करण्यात आला. याच धर्तीवर अंबाजोगाई व केज तालुक्यातील १४ हून अधिक गावांमध्ये जयंती उत्सव सुरू झाला. मराठवाड्यातील सर्वांत मोठा २५० सदस्य असलेला पुरूष बचत गट विनोद पोखरकर व मित्र परिवाराने सुरू केला. ते दरवर्षी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव तसेच मान्यवर यांचे सत्कार करतात. पुढील काळात विद्यार्थ्यांना मदत, मोफत रूग्णवाहीका आणि बचत गटाचे रूपांतर बँकेत करण्याचा पोखरकर यांचा मानस आहे. विनोद हे स्वतःला नेहमीच विविध सामाजिक कार्यात झोकून देतात. शहरातील व ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या असतील यावर ते तोडगा काढण्याचे काम स्वखर्चाने करतात. सर्वसामान्यांसाठी सतत धडपडणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची महाराष्ट्राभर ओळख आहे. ते दरवर्षी उन्हाळ्यात सामाजिक बांधिलकीतून लोकांना पिण्याचे थंड पाणी मिळावे या उद्देशाने मोफत पाणपोई सुरू करतात. याकामी त्यांना लहान बंधू प्रमोद पोखरकर व कुटुंबियांचे मोठे सहकार्य आणि आई - वडील व गुरूजणांचा आशिर्वाद लाभत आहे. आपण करीत असलेल्या कार्याची दखल समाज नक्कीच घेतो यावर त्यांचा विश्वास आहे. सबंध महाराष्ट्रातील उद्योजक यांना त्यांच्या कार्याबद्दल व समाजातील नवयुवा उद्योजकांना प्रेरणा मिळावी म्हणून टायकोन्स ऑफ आशिया यांच्या माध्यमातून दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षीचा २०२४ चा हा महाउद्योजक रत्नदीप पुरस्कार हॉटेल साई सुरभीचे संस्थापक युवकांसाठी एक प्रेरणादायी असणारे व्यक्तिमत्व, सर्वांचे लाडके विनोद पोखरकर यांना रविवारी महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे येथे प्रदान करण्यात आला. त्याबद्दल विनोद सिद्राम आप्पा पोखरकर व हॉटेल साई सुरभी उद्योग समूह यांचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे

दैनिक वादळ वार्ताहे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनूडिजिटल छापन संपू ादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 के ज येथन तू यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित के ले आहे ( वाद के ज / बीड न्यायालय अंतर्गत )